# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli

**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**

**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ०२/१०/२०१९

## अहिंसा रॅलीत मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो. यांनी " बेबी मडावी" व "युगेंद्र मेश्राम" यांना घोषित केले "शांतीदूत"

- **निष्पापांचा खुन केल्याने जनतेसमोर नक्षलवादयांचा खरा चेहरा उघड- मा. पोलीस अधीक्षक**
- **नक्षलवाद्यांनो आदिवासी बांधवांचा छळ करणे थांबवा - सुनिता मडावी**
- **गडचिरोली पोलीस दलाव्दारे आयोजित "अहिंसा रॅली" ला गडचिरोलीकरांचा प्रचंड प्रतिसाद**

नक्षलवाद्यांनी गेली अनेक वर्षापासुन आदिवासी बांधवांना जल, जंगल, जमीनीचे खोटे स्वप्न दाखवुन तब्बल ५२६ निरपराध व निष्पाप नागरिकांचा क्रुरपणे खुन केला आहे. भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम असलेल्या मौजा इरपनार येथे राहणाऱ्या बेबी मडावी या विद्यार्थीनीचा नक्षलवाद्यांनी काहीही कारण नसतांना खुन केला होता. त्याचबरोबर शिक्षक युगेंद्र मेश्राम यांची पत्नी ही आरोग्य सेविका म्हणुन बोटेझरी या अतिदुर्गम गावी आपली सेवा बजावत होती. तिला भेटण्यासाठी युगेंद्र मेश्राम तेथे गेले असता नक्षलवाद्यांनी युगेंद्र मेश्राम यांचा देखील निघृणपणे खुन केला. या घटनांच्या निषेधार्थ व लाल बहादुर शास्त्री तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधुन गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने " भव्य अहिंसा रॅली" चे आयोजन करण्यात आले होते.

अहिंसा रॅलीचे उद्घाटन मा. जिल्हाधिकारी श्री. शेखर सिंग साो., मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे साो., मा. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विजय राठोड सर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मोहीतकुमार गर्ग साो., यांनी सर्वप्रथम महात्मा गांधी, लाल बहादुर शास्त्री, बेबी मडावी व युगेंद्र मेश्राम यांच्या प्रतिमेचे पुजन व दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. यानंतर मा. पोलीस अधीक्षकांनी रॅलीस संबोधित करतांना बेबी मडावी व युगेंद्र मेश्राम यांना " शांतीदूत" म्हणुन घोषित केले. तसेच नक्षलवाद्यांनी युगेंद्र मेश्राम व बेबी मडावी या दोन निष्पाप जीवांचा विनाकारण खून केल्याने नक्षलवादयांचा खरा चेहरा समाजापुढे आला असल्याचे सांगत,

नक्षलवादयांना जनाधार नसून ते फक्त स्वत:च्या फायदयासाठी आदिवासींवर अन्याय, अत्याचार करत असल्याचे म्हटले तसेच रॅलीस उपस्थित आत्मसमर्पित नक्षलवादयांनी हिंसा सोडुन शस्त्र खाली ठेवुन अहिंसेचा मार्ग स्विकारत आत्मसमर्पण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी बेबी मडावी यांची बहिण सुनिता मडावी तसेच युगेंद्र मेश्राम यांचे वडील ऋषी मेश्राम यांना अहिंसेचे प्रतिक समजला जाणारा “ चरखा” मा. जिल्हाधिकारी साो. यांच्या हस्ते देवुन गौरविण्यात आले.








